# Library & Information Centre

## GIT in NEWS

**Pudhari 14-02-2016**



बेळगाव : हर्षित कुलकर्णी पुरस्कार स्वीकारताना.

### जीआयटी महाविद्यालयाला दोन पुरस्कार

बेळगाव (प्रतिनिधी) : कर्नाटक लॉ सोसायटी संचलित जीआयटी महाविद्यालयाला नुकताच दोन पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. यामध्ये बेस्ट सपोर्टींग कॉलेज आणि बेस्ट इव्हेंन्ट ऑफ दि ईयर यांचा समावेश आहे. हुबळी येथील देशपांडे फौंडेशनतर्फे आंतरराष्ट्रीय युवा मेळाव्यानिमित्त युवा सम्मिट घेण्यात आले होते. त्यावेळी सदर पुरस्कार वितरित करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राध्यापक हर्षित कुलकर्णी यांनी सदर पुरस्कार स्वीकारले. याप्रसंगी डॉ.गुरूराज देशपांडे, डॉ.अण्णासाहेब अन्सारी, नारायण मूर्ती, मालती के.गोळा, शेखर गुप्ता आदी उपस्थित होते. त्या मेळाव्यामध्ये देशभरातील पाच राज्यांमधील २ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



बेळगाव : यशस्वी विद्यार्थ्यांसोबत जीआयटीचे प्राचार्य ए. एस. देशपांडे व अन्य.

### राष्ट्रीय स्पर्धांमध्ये जीआयटीचे यश

बेळगाव (प्रतिनिधी) : पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय स्तरावरील अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या अॅथलेटिक आणि बॅडमिन्टन स्पर्धेमध्ये गोगटे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले. अक्षय तरळे यांने अॅथलेटिकमध्ये १००, २०० आणि ४०० मी. धावणे स्पर्धेमध्ये तीन सुवर्णपदके मिळविली. बॅडमिंटनमध्ये जीआयटीच्या संघाने उपविजेतेपद प्राप्त केले. या विद्यार्थ्यांना जीआयटीचे चेअरमन उदय कालकुंद्रीकर, प्राचार्य डॉ.ए.एस.देशपांडे, आर.श्रीधर, पी.व्ही. कडगडकाई, क्रांती कुरणकर आदींचे मार्गदर्शन लाभले.